# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१५ – १६

## **साहेबरावजी बुट्टपाटील स्मृती व्याख्यानमाला**

प्रभात मंगळवार, दि. २ फेब्रुवारी २०१६ 07

# प्रामाणिक राहा, नक्कीच यशस्वी व्हाल

## रत्नाकर अहिरे : 'यशस्वी होण्याचे मानसशास्त्र' या विषयावर मांडले विचार

**राजगुरुनगर, दि. १ (प्रतिनिधी)** - जीवनात यशस्वी होण्यासाठी पैसा आवश्यक नसून नवनिर्मिती करणाऱ्या विचारांची खऱ्या अर्थाने गरज आहे. स्वतःशी प्रामाणिक राहून प्रयत्न केले तर तुम्ही नक्कीच यशस्वी व्हाल, असे प्रतिपादन मोटिव्हेशनल ट्रेनर रत्नाकर अहिरे यांनी राजगुरुनगर केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'यशस्वी होण्याचे मानसशास्त्र' या विषयावर बोलत होते. या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, संचालक शां. ल. घुमटकर, ॲड. मुकुंदराव आवटे, बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य प्रा. जी. बी. शिंदे, प्रा. ए. जी. कुलकर्णी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना यशाचे मानसशास्त्र सांगताना रत्नाकर अहिरे पुढे म्हणाले की, मुलांनी स्वतःमधील राजहंसाचा शोध घ्यायला हवा. शरीर व मन एकरूप ठेवून स्वतःमध्ये अंतर्बाह्य बदल करताना प्रत्येक क्षण आनंदाने जगायला हवा. आपल्याला मंदिरातील मूर्ती व्हायचे की मंदिरासमोरील पायरी याचा विचार करावा. मोठे होण्यासाठी प्रचंड कष्ट करावे. वेळेचा सदुपयोग करावा. आजूबाजूचे लोक काय म्हणतील याचा विचार न करता स्वतःच्या स्वप्नावर, सामर्थ्यावर विश्वास ठेवून मार्गक्रमण करा.

पुढे बोलताना अहिरे म्हणाले की, जीवनातला प्रत्येक क्षण अमूल्य असून स्वत;ला दिलेला शब्द पाळताना स्वतःमधील सर्वोत्तम बाहेर काढण्यासाठी प्रयत्न करा. दुसऱ्याचे दोष शोधत बसण्यापेक्षा स्वतःच्या आतमध्ये डोकावून पाहा. दुसऱ्याशी तुलना करून दुःख ओढावून घेऊ नका. अपयशाच्या भीतीने यशाची स्थिती निर्माण करायला घाबरू नका. मेहनतीच्या शेगडीवर स्वतःला कायम पेटवत ठेवा.




राजगुरुनगर : येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील स्व. साहेबराव बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत बोलताना रत्नाकर अहिरे.

स्वतःच्या पोटापुरता विचार न करता व्यापक विचार करा. स्वतः वर प्रेम करा. संकटांचा बाऊ करू नका. यशस्वी होण्यासाठी आत्मविश्वास आवश्यक असून विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून मिळणाऱ्या संधीचे सोने करण्यासाठी प्रयत्नपूर्वक कष्ट करण्याची तयारी ठेवा. आपले अज्ञान न लपवता विविध भाषिक कौशल्य, संगणकाचे ज्ञान मिळवून ज्ञानाच्या मार्गावर जाण्यासाठी प्रयत्न करा. प्रतिकूलतेवर मात करून जे मोठे होतात त्यांनाच जग सलाम करते हे ध्यानात ठेवा. यशस्वी होण्यासाठी जशी शक्ती लागते तशी सहनशक्ती ही लागते याचा विचार करून गरुडझेप घेण्याचा दृष्टीकोन अंगी बाणवा, असे आवाहन त्यांनी केले. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढावा यासाठी त्यांनी प्रात्यक्षिकासह अनेक उपयुक्त गोष्टी सांगितल्या.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख